**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ**
**अमरावती विभागीय मंडळ अमरावती.**
**MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION**

# शुद्धीपत्रक

पत्र क्रं अविमं/माप/ ४०८
दि. ३१/०५/२०२६

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त विद्यालय,
अमरावती विभाग अमरावती.

**विषय** :- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ१०वी) फेब्रुवारी/मार्च२०२६ च्या परीक्षेचे गुणपत्रक/प्रमाणपत्र वितरण तसेच माध्यमिक प्रमाणपत्र (इ१०वी) पुरवणी परीक्षा जुन/जुलै- २०२६ मध्ये प्रविष्ठ होणा-या विद्यार्थीयादी(प्रीलिस्ट) तसेच ऑनलाईन आवेदनपत्र शुल्काच्या चलान स्विकारणेबाबत.
**संदर्भ** :- पत्र क्रं रा.म./परीक्षा-२ /२२८६, दि. ३० /०५/२०२६ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ१०वी) फेब्रुवारी/मार्च२०२६ च्या परीक्षेचे गुणपत्रक/प्रमाणपत्र वितरण **सोमवार दि. ०१/०६/२०२६ रोजी, सकाळी ११.०० वाजता करावयाचे असून त्याच दिवशी विद्यालयांनी दुपारी ३.०० वाजता विद्यार्थ्यांना गुणपत्रक/प्रमाणपत्र व NSQF विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र इत्यादी साहित्य वाटप करावयाचे आहे.** तसेच माध्यमिक प्रमाणपत्र (इ१०वी) पुरवणी परीक्षा जुन/जुलै- २०२६ मध्ये प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची यादी(प्रीलिस्ट) तसेच ऑनलाईन आवेदनपत्र शुल्काच्या चलान खालील मान्य वितरण केंद्रावर दिनांक ०१/०६/२०२६ रोजी, सकाळी ११.०० वाजता खालील नमूद केंद्रावर स्विकारण्यात येत आहे. साहित्य प्राप्त झाल्याच्या ०८ दिवसात गुणपत्रक/प्रमाणपत्रामधील दुरुस्ती विभागीय मंडळ कार्यालयात रितसर प्रस्तावासह सादर करण्यात यावी.

| अ.क्रं | जिल्हा | केंद्राचे नाव | समाविष्ठ तालुके |
|---|---|---|---|
| १ | अकोला | न्यु इंग्लीश विद्यालय अकोला | अकोला, आकोट, तेल्हारा |
| | | ज्युबली इंग्लीश स्कुल, अकोला | पातुर, बार्शिटाकळी, बाळापूर, ~~दर्यापूर, नांदगाव~~ मुर्तिजापूर |
| २ | अमरावती | अमरावती विभागीय मंडळ कार्यालय टोपे नगर, अमरावती | अमरावती, भातकुली, तिवसा, दर्यापूर, नांदगाव खंडेश्वर, चांदूर रेल्वे, धामनगाव रेल्वे |
| | | एस. जी बॉईज हायस्कूल, परतवाडा, जि. अमरावती | अचलपूर, अंजनगाव सुजी, चिखलदरा, धारणी |
| | | श्री शिवाजी हायस्कूल, मोर्शी, जि. अमरावती | मोर्शी, वरुड, चांदूर बाजार |
| ३ | बुलढाणा | श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, बुलढाणा | बुलढाणा, मोताळा, मलकापूर, चिखली |
| | | जे.व्ही. मेहता हायस्कूल, खामगाव,. जि. बुलढाणा | खामगाव, शेगाव, संग्रामपूर, नांदुरा, जळगाव जामोद |
| | | जिजामाता हायस्कूल, सिंदखेड राजा, ता. सिंदखेड राजा. जि. बुलढाणा | मेहकर, सिंदखेड राजा, देऊळगाव राजा, लोणार |
| ४ | यवतमाळ | अभ्यंकर कन्या शाळा, यवतमाळ | यवतमाळ, कळंब, बाभुळगाव, नेर, घाटंजी, आर्णि, दारव्हा, राळेगाव |
| | | श्री शिवाजी हायस्केल, पुसद, जि. यवतमाळ | पुसद, दिग्रस, महागाव, उमरखेड |
| | | एस.पी.एस. हायस्कुल, वणी ता. वणी, जि. यवतमाळ | वणी, पांढरकावडा, मारेगाव, झरीझामणी |
| ५ | वाशिम | श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, वाशिम | वाशिम, मालेगाव, रिसोड |
| | | जे.सी. कनिष्ठ महाविद्यालय, कारंजा (लाड), जि. वाशिम | कारंजा, मंगरुळपीर, मानोरा |

**खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे:-**

१. प्रिलिस्ट दुरुस्तीचे पाने दुरुस्ती असल्यास लाल शाईने दुरुस्ती करुन स्वतंत्र पाकीटात सादर करणे अनिवार्य आहे.
२. आपल्या शाळेतील विद्यार्थी श्रेणीसुधार योजनेअंतर्गत (CIS) प्रविष्ठ झाला असल्यास संबंधीत विद्यार्थ्यांच्या पुर्वीच्या इ. १० वी च्या गुणपत्रिकेची छायाप्रत सादर करावी व गुणपत्रिकेवर (CIS) असा उल्लेख करुन आवेदनपत्र क्रमांक नमूद करावा.
३. आपल्या शाळेतील विद्यार्थी जून/जुलै-२०२६ परीक्षेस तुरळक विषय योजनेअंतर्गत (ISOLATED)/ परनपरीक्षार्थी (REPEATER) प्रविष्ठ झाला असल्यास संबंधीत विद्यार्थ्याच्या पुर्वीच्या इ. १० वी गुणपत्रिकेची छायांकीत प्रत/ऑनलाईन निकालाची प्रत सोबत जोडून त्यावर ISOLATED/REPEATER असा स्पष्ट उल्लेख करावे व आवेदन पत्र क्रमांक नमुद करुन प्रिलिस्ट सोबत सादर करावी.
४. आपल्या शाळेतील दिव्यांग विद्यार्थी परिक्षेस प्रविष्ठ होत असल्यास अशा विद्यार्थ्यांचे दिव्यांग प्रमाणपत्र (HANDICAP/DISABILITY CERTIFICATE) सादर करावे. प्रमाणपत्र सादर न केल्यास विद्यार्थी सवलतीपासून वंचित राहील व यांची संपुर्ण जबाबदारी आपली राहील.

उपरोक्त सुचनांची सर्व मुख्यध्यापकांनी नोंद घ्यावी व साहित्य सादर करण्याकरीता तसेच फेब्रुवारी/मार्च -२०२६ चे मुळ गुणपत्रक/प्रमाणपत्र स्विकारण्याकरीता प्रतिनीधी अधिकार पत्रासह पाठविण्याची व्यवस्था करावी.

S.V.Salunke
31.05.2026
(संगीता साळुंके)
विभागीय सहा.सचिव,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती.

**प्रत माहितीस्तव:-**

१. मा. सचिव, महा.रा. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्य मंडळ, पुणे.
२. शिक्षणाधिकारी(माध्यमिक) जि.प., अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम